तरुण भारत
Amcha Pune | 2026-09-03 | Page- 4
epaper.tarunbharat.net

# नादब्रह्म पथक समितीकडून सायबर सुरक्षेसाठी जागर

**पुणे, २ सप्टेंबर**

डिजिटल व्यवहार वाढत असताना सायबर फसवणुकीचे प्रकारही वाढत आहेत. या पृष्ठभूमीवर के. बी. जोशी इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांनी नादब्रह्म पथक समितीत विशेष इम्पॅक्ट ॲक्टिव्हिटीचे आयोजन केले. ग्रुप १ मधील क्षितिजा देवणे आणि खुशबू पठाण यांनी उपक्रमाचे नियोजन व आयोजन केले.

सायबर फसवणूक, फिशिंग, बनावट लिंक व वेबसाइट, ओटीपी फसवणूक, सुरक्षित पासवर्ड, सोशल मीडिया सुरक्षा तसेच ऑनलाइन व्यवहार करताना घ्यावयाची खबरदारी याबाबत मार्गदर्शन केले. ओटीपी, पासवर्ड व वैयक्तिक माहिती अनोळखी व्यक्तींना देऊ नये, असा संदेश देण्यात आला. समितीच्या सदस्यांनी उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. स्वप्नील जोशी, कमलेश कांठे आणि विशाल भेलके यांच्या परवानगी हा उपक्रम पार पडला. प्राचार्या डॉ. अनघा वैद्य, एचओडी प्रा. रुपाली सराफ आणि शिक्षक समन्वयक प्रा. मनाली सपकाळ यांचे मार्गदर्शन लाभले.

Powered by Bharati Web